जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - १६०          दिनांक - ०६/०३/२०२४**

खंडणी विरोधी पथक - २ गुन्हे शाखा, पुणे शहर

**माथाडीच्या नावाखाली क्रियेटीसिटी मॉल येरवडा पुणे येथील वुडन स्ट्रीट फर्निचर कंपनीच्या प्रतिनिधींना बेकायदेशीर पैशाची मागणी करणा-या गुन्हेगारावर कारवाई**

वुडन स्ट्रीट फर्निचर प्रा.लि. क्रियेटीसिटी मॉल,येरवडा पुणे या कंपनीचे तक्रारदार यांना इसम नामे **शेखर मारुती लोंढे वय ३७ वर्षे, रा. नागपुर चाळ, जुना जकात नाक्याच्या पाठीमागे, नागपुरचाळ पोलीस चौकी समोर, येरवडा पुणे** हा माथाडीच्या नावाखाली वेअर हाऊस वरुन फर्निचर मटेरीयल घेवुन आलेल्या ट्रक मधील फर्निचर फिर्यादी यांचे कामगारांना खाली करु न देता आडवणूक करुन, आम्ही येथील स्थानिक आहोत असे सांगुन फिर्यादी यांचेकडे प्रति महिना १८ हजार रुपये व कंपनीचे हाऊसकिंपींग तसेच लेबरचे कॅन्ट्रक्ट स्वतः ला देण्याकरीता जीवे ठार मारण्याची धमकी देत असलेबाबत तक्रार खंडणी विरोधी पथक-२, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडे प्राप्त झाली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीअंती आरोपी नामे शेखर मारुती लोंढे यांचेकडे नमूद कंपनीची माथाडी संदर्भात कोणतीही वर्क ऑर्डर नसल्याचे तसेच तो माथाडी बोर्ड या ठिकाणी नोंदीत कामगार नसताना माथाडीच्या नावाखाली तक्रारदार असल्याचे धमकावत असल्याचे व यापुर्वी देखील आरोपीने तक्रारदार यांचेकडून धमकी देवुन १२ हजार रुपये स्वीकारल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार प्राप्त तक्रारीवरुन आरोपी शेखर मारुती लोंढे याचेविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. १२७/२०२४ भा.दं.वि.कलम ३८६,३८७ अन्वये दिनांक ०५/०३/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी शेखर मारुती लोंढे हा सध्या पोलीस कस्टडीत आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री. अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, प्रविण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अमोल झेंडे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२ श्री. सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक श्री प्रताप मानकर, पोलीस उपनिरीक्षक मोहनदास जाधव, पोलीस अंमलदार विजय गुरव, संग्राम शिनगारे, सैदोबा भोजराव, अमोल पिलाने, चेतन चव्हाण, चेतन शिरोळकर यांनी केलेली आहे.